# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १४/१२/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १४/१२/२००४ रोजीची सभा (तहकुब सभा) सुचना क्र. २०, सभा क्र. २ दि. १०/१२/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात दुपारी ०२.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सभापती |
| २) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सदस्य |
| ३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ७) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ८) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| ९) | श्री. मिलन गो. पाटील | सदस्य |
| १०) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |

### रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करून आजच्या तहकुब सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

**प्र. सचिव :-**

सभा १५ मि. करिता तहकूब झाली होती आणि आता सभा पुन्हा सुरू झाली त्याकरिता हजेरी घेऊन सभेला सुरूवात करण्यात येईल.

**रिटा शाह :-**

हजेरी घ्यायचे बरोबर आहे. पण सभासद निघून गेले त्याचे काय?

**प्र. सचिव :-**

जेवढे सदस्य असतील तेवढ्याच सदस्यांमध्ये मतदान होईल.

**रिटा शाह :-**

म्हणजे ही सभा कन्टीन्यू करायची.

**प्र. सचिव :-**

आता तहकूब झालेली सभा पुन्हा सुरू करतोय.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने प्रकरण क्र. ११६ वर गंभीर स्वरूपाची चर्चा झालेली आहे. सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी जो ठराव दिलेला आहे, त्या ठरावात मी थोडीशी दुरूस्ती सुचवून त्याच्यात ॲडीशन म्हणून.......

**रिटा शाह :-**

दुरूस्ती नाही, तुम्ही सुचवू शकता आपण सुचना द्या.

**हॅरल बोर्जीस :-**

त्याच्यात मी ॲडीशन सुचवतोय, सन्मा. सदस्य रिटा शाह ह्यांच्या ठरावात प्रकरण क्र. ११६ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात संत गाडगेबाबा अभियाना अंतर्गत प्रभागनिहाय नाले साफसफाईबाबतचा अहवाल प्रशासनाला प्राप्त झालेला आहे त्यानुसार ठेकेदारांना यापुर्वी दिलेल्या साफसफाई निविदेमध्ये त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेउन त्यावर प्रशासनाकडून बजावण्यात आलेल्या नोटीसांचा योग्य विचार करून वरील अहवालानुसार ठेकेदारांकडून करारनाम्यानुसार अटीशर्तीचा भंग झालेला असेल तर त्यांना त्याबाबतच्या कायदेशीर नियमाच्या नोटीसा देण्यात याव्यात व अशा ठेकेदारांना काळया यादीत टाकून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करावी असे या ठरावात मी ॲडीशन सुचवित आहे.

**रिटा शाह :-**

हॅरल बोर्जीस साहेबांनी चांगली सुचना दिलेली आहे कारण मी देखील जो ठराव मांडलेला आहे ते असे वाटते की, कायदेशीर बाजू बघूनच मी ठराव मांडलेला आहे. पहिले मला प्रशासनानेच उत्तर द्यायचे की, तुम्ही जो रिपोर्ट तयार केलेला आहे ते कुठल्या माध्यमातून तयार केलेले आहे. घरी बसून केले आहे की, की तुम्ही काहीतरी चौकशी करून केलेले आहे, ते कशा पद्धतीने तुम्ही रिपोर्ट तयार केलेला आहे. त्यांची सूचना मी मान्य करते कारण कायदेशीर कार्यवाही आपण सर्व बाजू बघूनच करणार आहोत, तो प्रशासनाचाच भाग आहे, त्यांचा भागपण नाही. आम्ही ठराव करण्याचा फक्त आमचा अधिकार आहे. त्याच्यावर इम्प्लीमेन्टेशन करायचे काम प्रशासनाचे आहे. आपण जो ठराव आणि अहवाल, रिपोर्ट आमच्याकडे सादर केला ते तुम्ही फक्त घरी बसून तुम्हाला असे वाटले की, आम्हाला असे लिहायचे आहे म्हणून लिहिलेले आहे की तुम्ही सर्व बाजूची पडताळणी करून तो रिपोर्ट आमच्याकडे सादर केलेला आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेबांच्या संमतीने बोलतोय, त्याच्यात मी ॲडीशन असे विचारतोय, आरोग्य विभागाचे जे विशेष कार्यकारी अधिकारी त्यांनी मघाशी जे वक्तव्य केले की, माझ्यापर्यंत अजून अहवाल पोहचलेला नाही, ह्याच्यामध्ये किती सत्यता आहे? मला प्रशासनाकडून खुलासा देण्यांत यावा.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी ह्यांनी ठराव मांडला होता त्याच्यात दुरूस्ती सुचविली होती. तर ती दुरूस्ती आपल्याला मान्य आहे का?

**रिटा शाह :-**

साहेब, मी काय बोलले, त्यांनी जी दुरूस्ती सुचविली त्याच्याशी मला घेणदेण नाही. मी ठराव मांडलेला आहे तेवढे मला माहित आहे आणि त्याच्यामध्ये मी फक्त त्यांच्या सुचनेवर उपसुचना केलेली आहे की, त्यांनी जी सुचना मांडली ते बघुन असे करून नसेल, असेल ते लिहिलेले आहे. मी डायरेक्ट बोलते की, प्रशासनाने जो अहवाल तुमच्यापर्यंत सादर केला आणि तुम्ही आमच्याकडे सभामध्ये सादर केलेला आहे, ते कायदेशीर सादर झालेले आहे. त्या अहवालाचा रिपोर्ट त्यांनी जो सादर केलेला आहे ते आपले प्रभाग अधिकारी, अधिकारी ह्यांनी घरी बसून केलेला आहे की जागेवर जाउन पाहणी केल्यानंतर त्यांनी आपला रिपोर्ट सादर केलेला आहे. त्या रिपोर्टवरुन साहेब डायरेक्ट कळते की, तो रिपोर्ट बघून कुठलाही लहान मुलगा सांगू शकतो की, तिथे काम झालेलेच नाही. त्यांचा रिपोर्ट असा निगेटीव्ह आहे आणि ह्या निगेटीव्ह रिपोर्टवरच सभा चाललेली आहे आणि त्याच्यावर असलेली तुमची सुचना मला मान्य आहे की, त्याला नोटीस पाठविली की नाही. कारण हे सर्व झाल्यानंतरच हा रिपोर्ट आलेला आहे. जर नोटीस पाठविली असेल, जाबजवाब विचारला असेल, ॲग्रीमेंटचा भंग केला असेल त्याबद्दलही नोटीस पाठविली असेल आणि त्यानंतरही ठेकेदाराने काय केले नसेल तेव्हा त्या अधिका-यांनी आपल्याकडे रिपोर्ट सादर केलेला आहे की, असे असे झालेले आहे, त्यानंतर ही आपल्याला असे वाटते की सगळी चौकशी करून त्याच्यानंतर ठेका रद्द करायचा आणि ब्लॅक लिस्टमध्ये

टाकायचे ते तुमचा अधिकार आहे आणि प्रशासनाचा अधिकार आहे की, प्रशासनाने कुठल्या वे ने जायचे ते प्रशासनाने नक्की करायचे आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहजी आपण बोललात ते बरोबर आहे. आपल्याला यापूर्वी जो अहवाल आपल्या समोर मांडण्यात आला, जो अहवाल ठेवण्यांत आला त्या अहवालाचे वाचन झाले, ते टेपिंगसुद्धा झालेले आहे. त्या अहवालाबद्दल साशकंता नाही. त्याच्यामुळे तुम्ही तो अहवाल बरोबर आहे किंवा बरोबर नाही हा विषय येथे येतच नाही.

**रिटा शाह :-**

बरोबर आहे किंवा बरोबर नाही असे बोलले नाही तर ते बरोबरच आहे. कारण त्यांनी पूर्ण पाहणी केल्यानंतर तो देखील एक जिम्मेदार ऑफीसर आहे ज्यांनी ज्यांनी अहवाल सादर केलेला आहे त्यांना सर्वांना स्वतःची जिम्मेदारी माहित आहे. सर्व इन्स्पेक्शन, ॲग्रीमेंटच्या अटीशर्ती भंग झाली की नाही झाली, ते सर्व बघून त्यांनतर आपल्याकडे तो रिपोर्ट सादर केलेला आहे आणि दुःखाची गोष्ट अशी आहे की, ते सादर तुमच्या माध्यमातून आपल्याकडे झालेले आहे आणि प्रशासनाने स्वतःची चुक कुठे झालेली आहे ते आपल्याकडे सादर केलेले आहे. पण आता अशी दुःखाची गोष्ट आहे की आपल्याला त्याच्यावर त्या ठेकेदारांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे आणि त्यांचा ठेका रद्द करण्यासाठी निर्णय घेण्यासाठी आपल्याला तीन तास लागेल, ही दुःखाची गोष्ट आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला जी सूचना, दुरूस्ती सुचविली आहे ती मान्य आहे का अमान्य आहे.

**रिटा शाह :-**

कुठलीही सुचना मला मान्य करायची का नाही मान्य करायची, तो माझा अधिकार नाही. कारण माझा अधिकार ठराव मांडायचा आहे आणि तो मी मांडलेला आहे.

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, आता आम्ही जो ठराव मांडला त्याच्यावर मी देखील तांत्रिक उपसूचना दिला होती. त्याच्यानंतर सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांनी देखील जी सूचना मांडलेला आहे ती त्याच्याशी मिळती जुळती आहे. जर समजा, आपल्याला जे गृहीत आहे त्याचा फिक्स असा मसुदा आमच्यासमोर ठेवा की, या ठरावानुसार या दोघांच्या सुचनेप्रमाणे असा फायनल मसुदा आणि तो ठराव आपण मंजूर करा ना!

**मा. सभापती :-**

मी तुम्हाला तेच मघाशी बोललो पण सन्मा. सदस्या बोलतात की, मी ते मागे घेउ शकत नाही, मागे करु शकत नाही किंवा दुरूस्ती मी सुचवू शकत नाही.

**रिटा शाह :-**

मी दुरूस्ती बोललीच नाही. मला दुरूस्ती करायची नाही. मी जो ठराव तुम्हाला लेखी स्वरूपात दिलेला आहे, साहेब आपण मिसअंडरस्टॅडींग करता.

**मा. सभापती :-**

मी मिसअंडरस्टॅडींग करत नाही आणि सन्मा. सदस्या मिसअंडरस्टॅडींग करण्याची माझी भूमिकाही नाही. आपण आता स्पष्ट बोललात की, मला दुरूस्ती सुचवायची नाही. मग आपल्या ठरावावर जी उपसुचना सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स ह्यांनी ही सूचना आपण मांडावी.

**रिटा शाह :-**

ती मांडून झालेली आहे.

**मा. सभापती :-**

ती मांडून झालेली नाही, ठरावावर उपसूचना मांडा.

**रिटा शाह :-**

त्यांनी उपसूचना मांडलेली आहे.

**मा. सभापती :-**

ते आता उपसूचना मांडतील. आपण, त्यांनी उपसूचना मांडायच्या वेळी सभा तहकूब केली होती आणि आता ते उपसूचना मांडतील.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांनी ते वाचले.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांनी आपल्याला दुरूस्ती सुचविली ती दुरूस्ती आपण अमान्य केली म्हणून सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स साहेबांनी उपसूचना मांडलेली आहे, ती उपसूचना वाचावी.

**रिटा शाह :-**

जेव्हा सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस ह्यांनी बोलायचे सुरू केले तेव्हाच मी बोलली, ती सुचना आहे.

**अशोक पाटील :-**

सुचना अमान्य केलेली नाही.

**रिटा शाह :-**

मी अमान्य केले नाही.

**अशोक पाटील :-**

सुचना अमान्य केलेली नाही, सुचना मान्य आहे पण फक्त तुम्ही मसुदा सांगा की तो मसुदा काय आहे.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य अशोक पाटीलजी त्यांनी आता स्पष्ट सांगितले की, मी ती सुचना, ती दुरूस्ती मान्य करत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, मी असे बोललीच नाही. मी काय बोलले ते तुम्ही समजूनच घेत नाही.

**मा. सभापती :-**

अधिकारी येथेच आहेत.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस ह्यांनी जी सुचना मांडली, मी असे बोलले की ती त्यांची सुचना आहे. मी मांडलेला ठराव माझा आहे.

**मा. सभापती :-**

दुरूस्ती जी सुचविली ती अमान्य केली की, नाही.

**रिटा शाह :-**

अमान्य कुठे, असे मी कुठे बोलली का? आपण टेपिंग वाजवून बघा.

**अशोक पाटील :-**

ॲसेप्ट करतोय असे सांगा ना!

**मा. सभापती :-**

आपण टेपिंग वाजवून बघा. दोन मिनिटांपूर्वी त्यांनी असे सांगितले की, मला ही दुरूस्ती मान्य नाही.

**रिटा शाह :-**

नाही, असे मी बोलले नाही. आपण टेपिंग वाजवून बघा.

**मा. सभापती :-**

म्हणजे तुम्हाला ती दुरूस्ती मान्य आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण अजून कन्फ्युजनमध्ये आहात. मी असे बोललीच नाही.

**अशोक पाटील :-**

त्यांनी सुचना अमान्य केलेली नाही.

**मा. सभापती :-**

ते आता त्यांना सुचना मान्य आहे का?

**रिटा शाह :-**

ते असे मान्य आहे किंवा अमान्य आहे असे मी बोलणार नाही, माझा शब्द मी काय बोलते. मी जो मांडलेला ठराव आहे तो मी लेखी स्वरुपात दिलेला आहे. सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस ह्यांनी जी उपसूचना दिलेली आहे की, त्यांनी जी सुचना केलेली आहे की कायदेशीर अटीशर्ती ॲग्रीमेंट बघून त्याच्यामध्ये जर ते आढळत असेल तर आपण त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकू अशी त्यांनी सुचना मांडलेली आहे. त्याच्यावर माझी अशी सुचना आहे की ठामपणे ठराव क्लिअर कट मांडलेला आहे त्याच्यामध्ये मी क्लिअरकट उल्लेख केलेला आहे की, तुमच्या अहवालाच्या अनुसार असे काही घडलेले

आहे आणि ते नक्की घडलेले आहे म्हणून ते असे तसे करायचे, असे तिथे काय महत्त्व वाटत नाही. ही सुचना जी आम्ही मांडलेली आहे ती त्यांची सुचना आहे. त्याचा मी विरोध करत नाही, पण त्यांच्या सुचनेवर मी सुचना मांडत आहे की मी जो ठराव ठामपणे आणि क्लिअरकट केलेला आहे, तो तुमच्या अहवालाच्या आधारे मी केलेला आहे आणि त्या अहवालाच्या आधारे असे क्लिअरकट झालेले आहे की, ज्या ठेकेदाराने काम केलेली आहेत, ती कामे व्यवस्थितपणे केलेलीच नाही म्हणून त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकायचे आणि त्यांचे ठेके रद्द करायचे असा मी ठराव मांडत आहे.

**मा. सभापती :-**

त्यांनी ठराव मांडलेला आहे, त्याच्यावर आपण आपली उपसुचना मांडा.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ११६ सन्मा. सदस्या रिटा शाह ह्यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला मी उपसुचना मांडतो.

(सन्मा. सदस्य श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी सभागृहात उपसुचनेचे वाचन केले.)

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ह्याला माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

ठराव कसे, आपण आता उपसुचना बोलत होते आणि आता परत ठराव.

**मा. सभापती :-**

उपसुचना मांडली, बरोबर आहे आणि आता ते मी मतदानाला टाकतो.

**रिटा शाह :-**

ठिक आहे, ह्याच्यावर दोन ठराव झाले. त्याच्यामध्ये जी उपसुचना मांडली होती त्याच्यामध्ये माझा एक असा प्रश्न आहे की, जेव्हा अहवाल, रिपोर्ट सादर केला विभाग प्रमुखांनी, त्यांनी घरी बसून रिपोर्ट तयार केला की, जागेवर जाउन परिक्षण करून ॲग्रीमेंटचा भंग झाला की नाही झाला, ते बघून अहवाल तयार केलेला आहे, असा मी प्रश्न विचारला होता.

**मा. सभापती :-**

उपसुचना आता मांडलेली आहे, ती मतदानाला टाकायची का नाही टाकायची. मतदानाला टाकायला लागेल, मतदानाला तुम्ही टाकून द्या आणि पुढची कार्यवाही करा.

**प्र. सचिव :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने, प्रकरण क्र. ११६ करिता दोन ठराव आणि एक उपसुचना आलेली आहे. नियमानुसार जो दुसरा ठराव आलेला असेल तो पहिला प्रथम मताला टाकायचा असतो. पहिली असते ती शेवटी टाकायची असते.

(सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स ह्यांनी मांडलेल्या उपसुचनेचे वाचन करण्यात आहे.)

**अशोक पाटील :-**

साहेब, आमच्या ठरावात मी जी सुचना केली ती समाविष्ट केली ना, की कायदेशीर बाबींची पुर्तता करून.

**मा. सभापती :-**

ठरावात ते लेखी आले नाही म्हणून आपण ते घेतले नाही.

**अशोक पाटील :-**

त्याच्यात मी सुचना मांडली होती.

**मा. सभापती :-**

पण आपला तसा लेखी ठराव आला नाही. जो लेखी ठराव आला तोच ठराव घेतला आहे.

(मतदान प्रक्रिया सुरु करण्यांत आली.)

**प्र. सचिव :-**

दहा सदस्यांमध्ये मतदान झालेले आहे, तटस्थ कोणी नाही. ह्या ठरावाच्या बाजूने सात सदस्य आणि विरोधात तीन सदस्य आहेत.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११६ करिता सुचक - श्रीम. रिटा शाह आणि अनुमोदन - श्री. अशोक पाटील ह्यांनी दिलेल्या ठरावाचे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

सचिवजी त्याच्यामध्ये मी सुचना मांडली होती की, थोडासा बदल करण्यासंदर्भात की, कायदेशीर बाबींची पुर्तता करून प्रशासनाने तो ठेका रद्द करण्याची कार्यवाही करावी.

**प्र. सचिव :-**

तसे आपण लेखीमध्ये द्यायला पाहिजे होते.

**अशोक पाटील :-**

तसे तुमच्या सुचना नव्हती म्हणून लेखी दिलेले नाही. हरकत नाही, जसे आहे तसे तुम्ही स्विकारा किंवा फेटाळा.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, सुचना मांडायची असते व नंतर लेखी द्यायची असते. ठराव पण आम्ही मांडतो लगेच आम्ही लिहून आणत नाही. ठराव येथे बसूनच आम्ही लिहितो त्याचीदेखील सुचना ते लिहून देवू शकतात, असे काही नाही द्यायची असेल तर त्यांचा तो अधिकार आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांची सुचना घ्यायला पाहिजे.

**अशोक पाटील :-**

आम्ही ठराव येथे काही कधी लिहून देत नाही, सुचना आम्ही मांडलेली आहे आणि ती रेकॉडिंग झालेली आहे.

**रिटा शाह :-**

ठराव आम्ही घरून लिहून आणत नाही. ठराव आम्ही येथे बसून लिहिलेला आहे.

**अशोक पाटील :-**

तुम्ही तुमचे लिगली ओपीनियन सांगा. सुचना आम्ही जी मांडलेली आहे ती लिगली रेकॉडिंग झालेली आहे.

**प्र. सचिव :-**

रेकॉडिंगवर आलेली आहे.

**रिटा शाह :-**

ठरावात सुचना मांडल्यानंतरच लिहायची असते.

**अशोक पाटील :-**

लिहायची प्रोव्हीजन जर तशी असेल तर आम्हाला तसे सांगा की, लिहायची प्रोव्हीजन असते. लेखी स्वरूपाची प्रोव्हीजन तुमच्याकडे आहे का?

**प्र. सचिव :-**

आपले जे मत आहे ते इतिवृत्तांताच्या चर्चेमध्ये येणार.

**अशोक पाटील :-**

ठिक आहे, आम्हाला तेच म्हणायचे आहे.

(मतदान प्रक्रिया सुरु करण्यांत आली.)

**प्र. सचिव :-**

तटस्थ कोणीही नाही, ठरावाच्या बाजूने तीन सदस्य आणि ठरावाच्या विरोधात सात सदस्य आहेत.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. ११६ संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान अंतर्गत साफसफाई आरोग्यबाबत असलेल्या अहवालावर चर्चा करणे व निर्णय घेणे. याबाबत आलेल्या ठरावावर सुचक - हॅरल बोर्जीस व अनुमोदन - मॉरस रॉड्रीक्स ह्यांच्या बाजूने एकूण ७ मते आणि विरोधात ३ मते आहेत. तसेच, प्रकरण क्र. ११६ या ठरावाला सुचक श्रीम. रिटा शाह व अनुमोदन श्री. अशोक पाटील या ठरावाच्या बाजूने ३ मते आणि विरोधात ७ मते आहेत. यामुळे सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी मांडलेली उपसुचना बहुमताने मंजुर झाली असे मी घोषित करतो.

**अशोक पाटील :-**

या मंजूर झालेल्या ठरावाची अंमलबजावणी होणार का?

**मा. सभापती :-**

ठरावाची अंमलबजावणी होणार.

**अशोक पाटील :-**

असे बरेच ठराव होतात पण त्याची अंमलबजावणी होत नाही म्हणून विचारतोय.

**मा. सभापती :-**

ठरावाची अंमलबजावणी आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच करणार.

**प्रकरण क्र. ११६ :-**

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान अंतर्गत साफसफाई (आरोग्य) बाबत आलेल्या अहवालावर चर्चा करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. १२८ :-**

वरील विषया अंतर्गत नालेसफाई गटार सफाई, औषध फवारणी, मजुर पुरविणे वगैरे बद्दल जो अहवाल प्रशासनाने सादर केले आहे त्या हिशोबांनी सदर कार्य घेणारे प्रायव्हेट ठेकेदार घेऊन, ठेकेदारांच्या हिशोबांनी काम केलेले नाही. नाले सफाई योग्य रितीने झालेले नाही. तसेच औषध फवारणी योग्य रितीने झालेली नाही. तरीसुद्धा ठेकेदारांची बिले पास झालेली आहे. सदरच्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून, त्यांना भविष्यात ठेका देण्यांत येऊ नये. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहरांतील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला आहे. तरी त्यांचे ठेके रद्द करावेत असा मी ठराव मांडीत आहे.

**ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य**

१) श्रीम. रिटा शाह
२) श्री. अशोक पाटील
३) श्री. जोजफ घोन्सालवीस

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्री. मॉरस रॉड्रीक्स
२) श्री. हॅरल बोर्जीस
३) श्री. मिलन पाटील
४) श्री. केशव घरत
५) श्री. अनंत पाटील
६) श्री. मोहन पाटील
७) श्री. सुर्यकांत भोईर

**सुचक :- श्रीम. रिटा शाह. अनुमोदन :- श्री. अशोक पाटील.**
**ठराव बहुमताने नामंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ११६ :-**

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान अंतर्गत साफसफाई (आरोग्य) बाबत आलेल्या अहवालावर चर्चा करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. १२८(अ) :-**

वरील विषयांकित मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात संत गाडगेबाबा अभियान अंतर्गत नालेसफाई, प्रभागनिहाय साफसफाई बाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यानुसार ठेकेदारांना यापुर्वी दिलेल्या साफसफाई निविदेमध्ये केलेल्या कामाचा आढावा घेऊन त्यावर प्रशासनाकडून बजावण्यांत आलेल्या नोटीसांचा योग्य विचार करुन वरील अहवालानुसार ठेकेदारांकडून करारनाम्यांनुसार अटीशर्तींचा भंग झाला असेल तर त्यांना याबाबतचा कायदेशीर नियमाने नोटीसा देण्याबाबतची कार्यवाही करावी असा ठराव मांडत आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्री. मॉरस रॉड्रीक्स
२) श्री. हॅरल बोर्जीस
३) श्री. मिलन पाटील

४)	श्री. केशव घरत
५)	श्री. अनंत पाटील
६)	श्री. मोहन पाटील
७)	श्री. सुर्यकांत भोईर

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१)	श्रीम. रिटा शाह
२)	श्री. अशोक पाटील
३)	श्री. जोजफ घोन्सालवीस

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.		अनुमोदन :- श्री. मॉरस रॉड्रीक्स.**
**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११७ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

अशी किती प्रकरणे आहेत आणि किती रुपयांची आहेत.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, या वर्षामध्ये ६०,८९,८६७ रुपये इतकी रक्कम आपली निर्लेखीत करायची आहे.

**मिलन पाटील :-**

एवढी का आली? मग आपले उत्पन्न काय?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सा़े.) :-**

आपली जी टोटल डिमान्ड होती ती एकूण ८०,०४,६६१ रुपये इतकी डिमान्ड मागच्या वर्षामध्ये होते. त्यामधले आपले १८,१४,७९४ रुपये वसुल झालेले होते आणि ६०,८९,८६७ रुपये आपले बाकी होते. तर आपण ह्या वर्षामध्ये नवीन सर्व्हे घेतला, सगळ्या दुकानांमध्ये जाऊन, प्रत्येक भागामध्ये जाऊन आपल्या लोकांनी तिथे सर्व्हे केलेला आहे आणि त्यांना तिथे असे आढळलेले आहे की, तिथे प्रत्यक्षात बोर्डस् वगैरे नाही किंवा असे जाहिराती नाही म्हणून हा आपला रिपोर्ट येथे आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

आता आपण जे ८९ लाख सांगितले, तो आकडा धरुनच आपण बजेटमध्ये प्रोव्हीजन केली होती.

**अजीज शेख (मा. उपायुक्त साहेब) :-**

होय, ती धरूनच केली होती.

**मिलन पाटील :-**

बजेटमध्ये आपण जी प्रोव्हीजन केली तो आकडा धरूनच आपण बजेटमध्ये प्रोव्हीजन केली आणि १८ लाख रुपये फक्त त्याची वसुली झाली आणि जो अहवाल दिला होता तो कोणी दिला होता. आपण अहवाल मागविण्याकरिता जो लाखो करोडो रुपये खर्च केला होता तो अहवाल बरोबर आला नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी आपण जो प्रस्ताव याठिकाणी मांडलेला आहे, सुचना मांडलेली आहे. आपल्या ज्या जाहिराती करामध्ये ६० लाख ८९ हजार रुपये आपण अपेक्षित जाहिरात करामध्ये ज्या व्यापाऱ्यांच्या दुकानदारांच्या बोर्डावर जी आपण कर आकारणी केली होती, जाहिरात कराची. ती कर आकारणी केल्याविषयी जेव्हा व्यापाऱ्यांचे डेलीगेशन्स या पालिकेमध्ये मा. महापौर दालनामध्ये आले त्यावेळेला पदाधिकाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी म्हणजे विशेष पदाधिकाऱ्यांनी महापौरांच्या दालनामध्ये त्यावेळी त्यांना आपल्या क्षेत्राचे व्यापारी आहेत आणि त्या व्यापाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, आमच्या स्वतःचे जे दुकान आहे त्या दुकानावर आमचा जो सुचना फलक असतो, त्या सुचना फलकावर आपण जो

जाहिरात कर लावलेला आहे त्या जाहिरात कराचा आपण विचार करावा आणि तो जाहिरात कर आपण रद्द करावा. त्या दुकानावर आमचे जे दुकान आहे त्या दुकानाचे आम्हाला नाव देता आले पाहिजे, असे नाव लिहिता आले पाहिजे आणि आम्ही जे नाव लिहिले त्याच्यावर जर आपण जाहिरात कर लावत असाल तर तो भुर्दंड आम्हाला पडतो, ती आमची जाहिरात नाही. त्यामुळे तो खर्च आपण वगळावा. त्याकरिता मा. महापौर दालनातून त्यांना त्याबद्दलचे आपल्या शहरातील व्यापारी, आपले व्यापारी म्हणून त्यांना त्यांच्यामध्ये सुट दिली व सुट दिल्यानंतर त्याचा जवळजवळ खर्च ६० लाख ८९ हजार रुपये असा होत आहे म्हणून ती रक्कम निर्लेखित करण्याकरिता आपण या येथे हा प्रस्ताव आणलेला आहे.

**मिलन पाटील :-**

ह्याचे ठेका पद्धतीने दिले होते, का हे कंपनीकडे नेमले होते, का ह्याचा सर्व्हे करण्याकरिता. त्या कंपनीला आपण लाखो रुपये दिले, आपण कंपनीला सर्व्हे करण्याकरिता आपण किती पैसे दिले?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण टंडन असोशिएट कंपनी नेमलेली होती आणि याकामासाठी आपण त्यांना ११ लाख रुपये पेमेन्ट केले होते.

**मिलन पाटील :-**

११ लाख रुपये पेमेन्ट केले का, बाकी आहे?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

पेमेन्ट केलेले आहे.

**अशोक पाटील :-**

११ लाख रुपये त्यांनी ऑलरेडी घेतलेले आहे.

**मिलन पाटील :-**

आता आपण जेव्हा त्यांना टेंडर पद्धतीने, ठेका पद्धतीने ११ लाखा त्यांना दिले होते, त्याच्यामध्ये आपल्या काही अटीशर्ती असतील का नाही या बोर्डाचे अमुक एक मेजरमेन्ट हे बोर्ड म्हणजे त्यांचे ॲडव्हरटाईजमेंट आहे किंवा हे त्यांचे दुकानाचे नाव आहे, हे खाली बोर्ड आहे का वर बोर्ड आहे. हे बोर्ड लावल्यानंतर त्यांचे अमुक एक उत्पन्न वाढेल आणि अमुक उत्पन्न नुसते नाव असल्याने त्याचे घटेल असे आपण काहीतरी ठेका पद्धतीने दिले असेल त्याचे नियम आपण आखून दिले असतील. त्या नियमामध्ये त्यांनी काम केले का नाही. आपल्याला जर एवढे बजेट त्यांनी आखून दिले आणि आपण त्याच्या हिशोबाने बजेट प्रोव्हीजन केली.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब तेच बजेट आहे ६० लाख ८९ हजाराचे तेच बजेट त्यांनी आकारुन दिले होते आणि आपण ते माफ केल्याने कमी झाले.

**मिलन पाटील :-**

८९ लाखाचे त्यांनी आता सांगितले आहे.

**मा. सभापती :-**

६० लाख ८९ हजार रुपये त्याच्यापासुन अपेक्षित होते, दुकानावर जे बोर्ड होते.

**मिलन पाटील :-**

मग त्यांनी ८९ लाख सांगितले.

**मा. सभापती :-**

८९ लाख रुपये नाही तर ६० लाख ८९ हजार रुपये.

**सुर्यकांत भोईर :-**

पण ते बाकी आहे ना?

**मा. सभापती :-**

साहेब विषय अजून तुमच्या लक्षात आला नाही की, जाहिरातीचा आपण जो कर लावला, आपण दुकानदारांवर जाहिरात कर लावला.

**सुर्यकांत भोईर :-**

एकूण ७९ लाख का?

**मा. सभापती :-**

नाही, ६० लाख रुपये.

**अशोक पाटील :-**

आपण त्याची प्रोसिडींग नीट वाचा त्यात तुम्ही मांडलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

७९,०४,६००/- रुपये दिलेले आहे.

**केशव घरत :-**

आणि वसुली १८ लाख झालेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब १८ लाख रुपये वसुली केलेली आहे. ७९,८६७/- रुपये बाकी दाखवले आहे.

**मा. सभापती :-**

म्हणून ते व्यापारी आपल्याकडे आले. व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांनी काही व्यापाऱ्यांनी आपले बोर्ड काढले त्यांचे असे म्हणणे आहे की, आमचे दुकान आहे आणि आमच्या दुकानासमोर आम्ही जो बोर्ड लावतो, त्याचे आपण कर लावता त्याचे आम्हाला भुर्दंड पडतो त्याच्यामुळे तो कर आपला वसुल झाला नाही. तेवढाच मागील कर आपला वसुल झाला ह्याच्यापुढे आपल्याला कर मिळत नाही म्हणून व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ मा. महापौर यांच्या दालनामध्ये निर्णय घेण्यात आला की, त्याच्यामुळे आपण त्यांना सुट दिली व ती सुट दिल्यानंतर ती जी उरलेली रक्कम आहे, आपण तेवढी सुट दिल्यानंतर आपल्याला ती रक्कम मिळणार नाही म्हणून ते निर्लेखित करण्यासाठी आपल्याकडे प्रकरण आलेले आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, जे टी.व्ही ला ॲड येतात त्या नावाने येतात का त्यांचे नुसते प्रोडक्ट दाखवतात असे तर काही ना, ते ज्या दुकानाचे नाव असेल त्या प्रोडक्टचे नाव असेल तेच येईल. आपण जे बोलता कोणत्याही किराणा मालाचे परटीक्यूलर दुकान असेल तिथेच आपण जातो की नाही, आपण तिथे काहीतरी खर्च करतो की, नाही. आपण त्याला काहीतरी निर्देश दिले असतील की अमुक एक तुम्ही आम्हाला आखून द्या किंवा ह्या बोर्डाचे नाव घ्या. त्याच्याप्रमाणे त्यांनी आपल्याला हे दिले जे आपण ७९ लाख रुपयाचे केले व त्याप्रमाणे आपण बजेटमध्ये प्रोव्हीजन केली आणि आज आपले ११ लाख रुपये वसुल झाले आणि आपण त्याला एकूण ६० लाख रुपये निर्लेखीत करायचे म्हणजे ती बजेटमधून घट आहे की नाही, असे मला सांगायचे आहे. म्हणजे आपल्याला त्या कंपनीने काहीही करून दिलेले नाही, त्यांचे पैसे त्यांनी काढून घेतले.

**मा. सभापती :-**

साहेब आपण विषयाचे विषयांतर करता. सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी आपले म्हणणे बरोबर आहे. परंतु ७९ लाख रुपये जी आपल्याला अपेक्षित रक्कम होती त्याच्यामध्ये १८ लाख रुपये ही रक्कम आलेली आहे आणि उर्वरित जी ६० लाख रुपये जी रक्कम आहे, त्या रक्कमेविषयी जेव्हा व्यापारी आपल्याकडे आले, ते व्यापारी आल्यानंतर त्या करामध्ये आपण त्यांना सुट दिली व ६० लाख रुपयाचा आपण लॉस घेतला, ती रक्कम निर्लेखित करण्याकरिता आपण येथे प्रस्ताव आणलेला आहे.

**अशोक पाटील :-**

मिलन पाटील साहेब, हे आपण एकंदरीत एका एजन्सीला काम दिले होते आणि त्या एजन्सीला आपण ११ लाख रुपये मोजलेले आहे आणि त्यांनी जो सर्व्हे केला त्या सर्व्हेमध्ये ७९ लाख रुपये आपल्याला त्या बोर्डावर महसूली उत्पन्न मिळेल असे अपेक्षित होते.

**मा. सभापती :-**

म्हणजे दुकानाच्यावर असलेल्या बोर्डावर.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती साहेब, रस्त्यावर जे जाहिरातीचे बोर्ड लावतात त्याच्यावरती?

**मा. सभापती :-**

ते वेगळे आहे. तो फक्त बोर्ड आहे.

**अशोक पाटील :-**

साहेब, आपण आम्हाला खुलासा द्या की, आपण जी टंडन एजन्सी नेमली आणि त्यांना आपण ११ लाख रुपये मोजले तर त्यांनी टोटली सर्व्हे करून किती लाखाचे महसुली उत्पन्न आपल्याला अपेक्षित होते. टोटली, त्या एजन्सीच्या मार्फत जो सर्व्हे झाला होता. यावर्षासाठीच आहे ना! एकूण ६० लाखाची आपण जी तुट दाखवता ती तुट किती वर्षाची?

**संजय दोंदे :-**

या वर्षाची आहे.

**अशोक पाटील :-**

या वर्षाची आहे तर ह्या वर्षाचे उत्पन्न सांगा. एका वर्षाचे उत्पन्न सांगा. त्या एजन्सीने किती सर्व्हे केला होता.

**मिलन पाटील :-**

आपण त्याला जे टेंडर होते त्याच्यात काय अटीशर्ती असेल का नाही? आम्हाला आपण असे बोर्ड तयार करून द्या किंवा ही जाहिरात होईल किंवा हा बोर्ड होईल.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय. येथे जी तुट आपल्याला दिसत आहे त्याची दोन प्रामुख्याने कारणे आहेत. आपण जर गोषवारा बघितला, मागे दोन वर्षा अगोदर ज्या वेळेला शिवमुर्ती नाईक साहेब असताना रस्ता रुंदीकरणाची जी मोहिम झाली. त्या मोहिमेमध्ये बऱ्याचशा लोकांचे शेड तोडले गेले. तो एक फार मोठा प्रामुख्याने येथे अभाव आहे. त्यामुळे आपण चालु मागणी केली परंतु ती मागणी केल्यानंतर ही दुकाने आपण तोडली होती, तो एक भाग झाला. दुसरा भाग असा आहे की ज्यावेळेला सन्मा. महापौरांच्या दालनामध्ये या संदर्भामध्ये ज्यावेळेला सभा झाली. त्यावेळेला त्यांच्या निर्दशनात आले की, नामफलक आणि जाहिरात फलक अशी जी मागणीची आपली बिले आहेत. परंतु वस्तुस्थितीमध्ये अशी जाहिरात जागेवर नाहीच आहे, ज्याची आपण मागणी ऑलरेडी दिलेली आहे. त्याच्यामुळे ही तफावत, तुट आपल्याला दिसत आहे.

**अशोक पाटील :-**

बोर्जीस साहेब ते प्रोसिडींगमध्ये आलेले आहे आणि मी त्याबद्दल बोलत नाही. ही जी टंडन एजन्सी नेमलेली होती ज्यांना आपण ११ लाख रुपये मोजले त्यांनी जो सर्व्हे केला, त्या सर्व्हेमध्ये किती लाखाचा महसुल आपल्याला अपेक्षित होता, ह्याचा खुलासा आम्हाला पाहिजे.

**हॅरल बार्जीस :-**

येथे २५,८३,४५१ रुपये दाखवतात की, आपल्याला ते हे एवढे अपेक्षित आहे.

**अशोक पाटील :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेब आपण हे जे ७९ लाख रुपये दाखवले आहे, ती तुट सोडून द्या. टोटली किती लाखाचे अपेक्षित होते. ज्या एजन्सीला ११ लाख रुपये दिले त्यांनी जो सर्व्हे केला त्या सर्व्हेमध्ये किती लाखाचे महसुली उत्पन्न अपेक्षित होते.

**रिटा शाह :-**

मेन प्रश्न असा आहे की, त्यांनी हे एका वर्षात की, किती वर्षात दिलेले आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण ज्यावेळेस टंडन असोशिएटला त्या फमला वर्क ऑर्डर दिलेली होती, त्यांनी शहरामधले सगळ्यांचे सगळे बोर्डस् असतील, जाहिरात बोर्डस्, नामफलक असतील, वेदरशेड्र्स असतील आणि त्या व्यतिरिक्त इतर जे साईन बोड्र्स असतील त्या सगळ्यांचा त्यांनी सर्व्हे करून आपल्याला १ कोटी २५ लाख रुपयाचे उत्पन्न दाखवलेले होते. त्या व्यतिरिक्त त्यांनी शहरामधले असे काही स्पॉट्र्स दाखविले होते की, ज्याठिकाणी आपण आपले होर्डींग वगैरे आपल्या नगरपालिकेचे होते किंवा जी खाजगी संस्था आहे त्यांच्यावतीने आपण डिसप्ले करू शकू आणि त्यामधून आपल्याला उत्पन्न मिळू शकेल. अशा पद्धतीने त्यांनी संपूर्ण शहराचा सर्व्हे करून आपल्याला दिला होता आणि त्याच्या अग्नेस्ट आपण त्याला पेमेन्ट केले होते. नंतर आपण पॉलिसी डिसीजन म्हणून जे वेदरशेड्र्स होते ते उत्पन्न डिडक्ट केले होते आणि ह्या वर्षी जी जाहिरात फी आहे, जे नामफलक असतात तसेच जाहिरातीचे जे फलक असतात त्याच्यावर ७९,०४,६६१/- रुपये एवढे आपले टोटल डिमान्ड होते, मागच्या वर्षासाठी सन २००३-०४ साठी.

**अशोक पाटील :-**

म्हणजे १ करोड पैकी.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण वेदरशेड डिडक्ट केले होते, त्यामुळे आपली जी निव्वळ होती ती.

**अशोक पाटील :-**

साहेब, आपण मला माहिती द्या की, त्या एजन्सीने जो सर्व्हे केला होता, त्याच्यात महसुल उत्पन्न १ करोड २५ लाख रुपये अपेक्षित होते, ते एक वर्षाचे होते ना.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याला होर्डीगचे आपले वेगळे आहे. होर्डीगचे आपल्याला रितसर प्रत्येक वर्षाला जे रेग्युलर ॲग्रीमेंट केलेले आहे, त्यांच्याबरोबर. त्याप्रमाणे आपल्याला त्याचे उत्पन्न मिळते.

**अशोक पाटील :-**

एक वर्षाला आपल्याला किती अपेक्षित आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

होर्डीगचे जे आहे १९,३५,२५३ रुपये.

**अशोक पाटील :-**

आणि बाकी दुसरे कुठले हेड आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

जाहिरात कराचे.

**अशोक पाटील :-**

म्हणजे हे दोनच हेड आहेत ना! जाहिरात कर आणि होर्डीगचे मिळून ७९ लाख आणि १९ लाख तसे तुम्ही सव्वा करोडचे बजेट दाखवता.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण वेदरशेड कट केले आहे. मा. महासभेमध्ये तो निर्णय घेवून वेदरशेडचे डिडक्ट केले होते.

**अशोक पाटील :-**

ते डिडक्ट करून आपल्याला अपेक्षित उत्पन्न किती दाखवले होते.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

७९ लाख रुपये.

**अशोक पाटील :-**

७९ लाख रुपये फक्त जाहिरात फलकाचे. होर्डीगचे वेगळे धरले आहेत.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

होर्डीगचा विषय असा आहे की, आपण प्रत्यक्षात त्यांना त्या साईड दिलेल्या आहेत. त्यांच्या बरोबर आपले पाच वर्षाचे ॲग्रीमेंट झालेले आहे. त्या रक्कमेमध्ये कोणताही बदल होउ शकत नाही.

**अशोक पाटील :-**

आपल्याला ते एका वर्षाला किती अपेक्षित आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

ते आपल्याला वर्षाला १९,३५,२५३ रुपये मिळतात.

**अशोक पाटील :-**

१९ लाख रूपये दरवर्षाला आपले फिक्स आहेत. हे जे जाहिरात फलकामध्ये ७९ लाख होते त्याच्यात ६० लाख रुपये मा. महापौर यांच्या सुचनेनुसार तुम्ही कमी केलेले आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

होय, ७९ लाख रुपये आपले निव्वळ जाहिरातीचे राहिले होते. त्याच्यामध्ये आपले १८ लाख १४ हजार रुपये वसुल झाले होते आणि जी शिल्लक राहलेली होती ती ६० लाख ८९ हजार रुपये होती, मागच्या वर्षामध्ये.

**अशोक पाटील :-**

आणि ती माफ केलेली आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण ती माफ केलेली नाही, त्याच्या संबंधात आज आपल्याला हा निर्णय घ्यायचा आहे. कारण ज्यावेळी प्रत्यक्षात साईटवर आपले कर्मचारी गेले होते तर अनेक ठिकाणी बोर्ड्स नव्हते. रस्ता रुंदीकरणाचे काम चालू होते आणि नंतर येथे सुद्धा सभा झालेल्या होत्या. त्यामुळे आपले ६० लाख ८९ हजार रुपये आपले वसुल झालेले नव्हते.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, रस्ता रुंदीकरणामध्ये जी दुकाने तुटली असतील, जे गाळे तुटले असतील. त्यांचे जे बोर्ड असतील त्याचा सर्व्हे करताना तेव्हा ते नसतीलच ना! ह्या एक दीड वर्षामध्ये रस्ता रुंदीकरणामध्ये तुटले असतील.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

सर्व्हे जो झाला होता तो सन २००२ मध्ये झाला होता आणि त्यानंतर रुंदीकरणाचे अनेक कामे झालेले आहेत. त्या रुंदीकरणामध्ये बोड्‌र्स काढण्यात आलेले आहे. त्यामुळे ६० लाख ८९ हजार रुपये आपले शिल्लक राहिले होते. म्हणून ह्यावर्षी आपण संपूर्ण शहरामध्ये आपल्या कर्मचाऱ्यांच्यावतीने पुन्हा सर्व्हे घेतला, जी नामफलक आणि जी जाहिरातफलक आहेत ते किती आहेत. त्यामध्ये ती डिमान्ड आम्हाला लक्षात आलेली होती.

**सुर्यकांत भोईर :-**

नगरपालिका असताना हा निर्णय घेतलेला होता का?

**मा. सभापती :-**

प्रशासकीय काळामध्ये हा निर्णय घेतला होता. त्यावेळेला आपल्याला जवळजवळ २८ हजार रुपये जाहिरात कर मिळायचा. त्याच्यानंतर तत्कालिन आयुक्त, उपायुक्त, मुख्याधिकारी नाईक साहेब ह्यांनी हा सर्व्हे केला आणि हा सर्व्हे केल्यानंतर ही आपल्याला अपेक्षित रक्कम जी आपल्या समोर आहे जी आता वर्षाला २० लाख रुपये आपल्याला होर्डींगचे मिळतात आणि हे जे ७९ लाख रुपये जाहिरात कराचे मिळतात. हा ठराव आणण्यापुर्वी त्याच्यामध्ये अशी दुरूस्ती आपल्याला सुचवायची आहे की, ही रक्कम आपण रिलीफ करू व आपण त्या रक्कमेच्या पाठीमागे जे आपण दुकानाला बोर्ड लावायला देवू, ज्या दुकानाला बोर्ड लावतो त्या दुकानाचे फक्त नाव असेल की अशोक पाटील आणि सन्स पण त्याने त्याठिकाणी अशोक पाटील आणि सन्स सिमेंट कंपनी लिहिली, तर सिमेंट कंपनी लिहिताना अंबुजाचे सिमेंट ह्याठिकाणी मिळेल, मग ती अंबुजा कंपनीची जाहिरात झाली. तर ती जाहिरात झाल्यानंतर त्याला तो कर लागेल, पण त्याने अशोक पाटील ॲन्ड सन्स जर लिहिले तर त्याला तो कर लागणार नाही. म्हणजे त्याने आपल्या दुकानाचे नाव लिहावे. येथे किराणा मालाचे सामान मिळेल. पण ते किराणा सामान मिळताना अमुक पोस्टमन तेल, के.के. चे तेल किंवा अन्य गोदरेजचा साबण म्हणजे गोदरेजची ॲड झाली, के.के. ची ॲड झाली तशी ॲड जर त्याच्यावर आली त्या ॲडचा आपण चार्ज लावून घ्यायचा. पण त्याने जर फक्त अशोक पाटील ॲन्ड सन्स दिले, तर त्याला तो चार्ज आपण लावायचा नाही.

**मिलन पाटील :-**

हा जो सर्व्हे झाला तो सर्व्हे तो आपल्या निर्दशनाखाली झाली, त्याला आपले किती लोक होते?

**अशोक पाटील :-**

मिलन पाटील साहेब, हा सर्व्हे झाला नाही, हा निर्णय झाला, मा. महापौर दालनामध्ये.

**मिलन पाटील :-**

हा सर्व्हे नाही हा निर्णय दिला ना!

**मा. सभापती :-**

आपण जो विषय आणला आहे, ती रक्कम निर्लेखीत करण्याचा विषय आणला आहे. त्याच्यावर अगोदर सर्व्हे झालेला आहे, त्याचे पैसे आपल्याला वसुल झालेले आहे, आपल्याला जाहिरात करामध्ये होर्डींगचे पैसे मिळतात. परंतु जाहिरात करामध्ये जे दुकानाच्या बोर्डावर जो कर, जी रक्कम आपण आकारली होती, त्या कराच्या आकारावर आपल्या शहरातील आपले व्यापारी नाराज झाले होते. म्हणून तो व्यापारी वर्ग नाराज झाल्यामुळे मा. उपमहापौर, मा. महापौरांच्या दालनामध्ये येऊन निर्णय घेतला आणि त्यांना सांगितले की, आम्ही तुमचा जाहिरात कर हा रद्द करतो. परंतु जाहिरात कर रद्द करत असताना आपणाला ह्याच्यामध्ये असे ठरवायचे आहे की, दुकानाच्या नावाला आम्ही जाहिरात कर लावणार नाही. पण दुकानाच्या नावामध्ये जर तुम्ही जाहिरात केली त्याचा तुम्हाला चार्ज लागेल.

**अशोक पाटील :-**

सांगण्याचे तात्पर्य असे की, हा जो निर्णय झाला जे व्यापारी कोणी आले होते, त्यांचे शिष्टमंडळ, त्या शिष्टमंडळासमोर हा निर्णय झाला आणि हा निर्णय महापौर दालनामध्ये झाला आणि ते रुलिंग पार्टीच्या सदस्यांना माहिती नसल्यामुळे ते भांडताहेत. ते येथे किती मुद्दे उपस्थित करतात की, ह्याचे काय झाले म्हणून. कारण हा विषय आता आपल्या सभागृहासमोर आलेला आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ११७ सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील दुकाने आस्थापनेवरील न वसुल होणारी जाहिरात फी निर्लेखीत करणेबाबतचा ठराव मांडतोय.

**मिलन पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ११७ :-**

सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील दुकाने आस्थापनेवरील न वसुल होणारी जाहिरात फी निर्लेखीत करणेबाबत.

**ठराव क्र. १२९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील जाहिरात फी वसुली खालीलप्रमाणे.

| मागणी | वसुली | शिल्लक |
|---|---|---|
| ७९,०४,६६१/- | १८,१४,७९४/- | ६०,८९,८६७/- |

वरील वस्तुस्थिती पाहता सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील जाहिरात फीची मागणी बिले वितरण केले असता संबंधित दुकानावर जाहिरात फलक नसल्याचे आढळून आले, काही दुकाने कायम स्वरुपी बंद असल्याचे दिसून आले व नव्याने स्थापन झालेल्या महापालिका क्षेत्रातील अनेक रस्त्यांचे रस्ता रुंदीकरणाचे काम हाती घेतले होते. सदरच्या रुंदीकरणात महापालिकेच्या खाजगी ठेकेदाराने सर्व्हे केलेल्या दुकानांचे बोर्ड तोडण्यात आले होते. सदरचे बोर्ड तोडले असतांनाही मागणी मध्ये बोर्ड दाखवणेंत आले आहेत. प्रत्यक्ष जागेवर तपासणी केली असता बोर्ड नसल्याचे दिसून आले होते. सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील मागणी बिले वितरण केल्यानंतर अनेक नागरीकांच्या तक्रारी आल्या होत्या. अनेक राजकीय पक्षांचे मोर्चे महापालिकेवर आले होते. सदर बाबत मा. महापौर मॅडम यांच्या दालनात व्यापारी संघटनेबरोबर चर्चा करतांना मा. महापौर यांनी दुकाने अस्थापनेवरील नाम फलक व इतर जाहिराती ज्या अस्तित्वात नाहीत अशा जाहिरातींची जाहिरात फी रद्द करणेबाबत तोंडी आदेश दिले होते. जाहिरात फी लागु झाल्या पासुन ज्या खातेदारांचे २० चौ.फुट पेक्षा मोठे बोर्ड होते ते त्यांनी मागणी बिले प्राप्त झाल्या बरोबर त्वरीत सर्वसाधारण पणे २० चौ. फुटाच्या आत केले आहेत. त्यामुळे निश्चित केलेली मागणी वसुली करतांना अडचणी निर्माण होताहेत. या सर्व बाबींचा विचार करता सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सर्व दुकाने अस्थापनेवरील लावणेंत आलेल्या जाहिरात बोर्डांचे नव्याने सर्व्हे करणे आवश्यक होते. त्या नुसार मा. आयुक्त सो. यांनी दि. १४/६/०४ रोजी महापालिका क्षेत्रातील जाहिरात फीची नव्याने आकारणी करणेंसाठी आदेश दिले होते. त्यानुसार सन २००४-०५ या आर्थिक वर्षात नव्याने केलेल्या सर्व्हे नुसार आकारणीमध्ये नाम फलकाची जाहिरात फी रु. ११,१८,७६२/- व जाहिरात फलकाची जाहिरात फी रु. १४,६४,६८९/- इतकी आहे. त्यानुसार एकुण जाहिरात फी रु. २५,८३,४५१/- इतकी प्राप्त होऊ शकते. त्यानुसार मागणी बिले तयार करतांना मागील शिल्लक घेणे आवश्यक आहे. परंतु, सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील शिल्लक रक्कम रु. ६०,८९,८६७/- इतकी प्रत्यक्ष जागेवर बोर्ड नसल्याने वसुली होत नाही. त्यामुळे वसुली न होणारी रक्कम मुंबई प्रांतीक महापालका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये मा. स्थायी समिती ठरावानुसार सदरची रक्कम निर्लेखित करणेंचे अधिकार आहेत. सन २००४-०५ या वर्षाच्या अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापण या शिर्षकाखाली असलेल्या तरतुदीमधन वरील निर्लेखित रक्कम वर्ग करणेंत येईल त्यामुळे सदरची प्राप्त न होणारी रक्कम निर्लेखित करणेंत येत आहे. तसेच महापालिका क्षेत्रातील दुकाने अस्थापनेवरील फक्त नावाच्याच एका बोर्डवर संपूर्ण जाहिरात फी माफ करावी व अन्य सर्व जाहिराती बोर्डवर जाहिरात फी आकारावी व प्रत्येक वर्षी प्रत्यक्ष जागेवर जावून मोजमाप घेवून आकारणी करुन मागण बिले तयार करावीत.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस. अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ११८ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

सदरचा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ११८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे - महानगरपालिका पोटनिवडणूककामी स्टेशनरी पुरवठा केल्याबाबतचे अवलोकनार्थ. (भांडार विभाग)

**ठराव क्र. १३० :-**

महानगरपालिकेने दि. ३०/१०/२००४ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार पोटनिवडणूक प्रभाग क्र. १५ ब करिता स्टेशनरी साहित्य पुरवठा करण्याकामी खालील ठेकेदारांनी आपले दरपत्रके मुदतीत सादर केले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | साई प्रिंटर्स एन्ड स्टेशनरी | लकी प्रिंटर्स | निलिमा एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | ६ लिव्हरची दोन किल्ल्या असलेली कुलपे (नमुन्याप्रमाणे) | ६५/- प्रति नग | १३०/- प्रति नग | ७२/- प्रति नग |
| २ | मतपत्रिकेवर खूण करण्यासाठी बाणफुलीचे रबरी शिक्के (नमुन्याप्रमाणे) | २७/- प्रति नग | ३५/- प्रति नग | २२/- प्रति नग |
| ३ | पितळी सील (नमुन्याप्रमाणे) १ इंच व्यासाचे प्लास्टिक हॅन्डलसह (नमुन्याप्रमाणे) | ६२/- प्रति नग | ६५/- प्रति नग | ५८/- प्रति नग |
| ४ | मतदान केंद्राच्या विभेदक चिन्हांचा रबरी शिक्का (नमुन्याप्रमाणे) | ६८/- प्रति नग | ६९/- प्रति नग | ६३/- प्रति नग |
| ५ | मतदान कक्ष (नमुन्याप्रमाणे व ४२" x २०" कोरोगेटेड साईजनुसार) | २३०/- प्रति नग | २३५/- प्रति नग | १९५/- प्रति नग |
| ६ | लोखंडी पट्टी (स्थळप्रति पासून १२" मतपत्रिका अलग करण्यासाठी (नमुन्याप्रमाणे) | २२/- प्रति नग | ३५/- प्रति नग | १९/- प्रति नग |
| ७ | स्टॅम्प पॅड (मध्यम साईज) कोरस कं. | १८/- प्रति नग | १८/- प्रति नग | १६.५०/- प्रति नग |
| ८ | बॉल पॉईन्ट पेन्स (नमुन्याप्रमाणे) | ७/- प्रति नग | ८/- प्रति नग | ८/- प्रति नग |
| ९ | ढकल पट्टी (मतपत्रिका मतपेटीत १८ ढकलण्यासाठी लोखंडी (नमुन्याप्रमाणे) | २६/- प्रति नग | ३९/- प्रति नग | २४/- प्रति नग |
| १० | सा. ४२" x २६" एस. डी. पी. ई. बॅग | ९५/- प्रति नग | २१४/- प्रति नग | ७५/- प्रति नग |
| ११ | पांढरे कागद (सा. ८" x १३") | १८५/- प्रति रिम | २२५/- प्रति रिम | १९५/- प्रति रिम |
| १२ | आखिव कागद (सा. १३" x १६") (नमुन्याप्रमाणे) | २४०/- प्रति रिम | २६०/- प्रति रिम | २६०/- प्रति रिम |
| १३ | ब्लॉटींग पेपर्स (टीपकागद) १८" x २३" आकाराचा (नमुन्याप्रमाणे) | १७५०/- प्रति रिम | २२००/- प्रति रिम | १९५०/- प्रति रिम |
| १४ | ब्राऊन पेपर्स २९" x ४४" (नमुन्याप्रमाणे) | १५५०/- प्रति रिम | २३००/- प्रति रिम | १४७५/- प्रति रिम |
| १५ | कार्बन पेपर्स कोरस सफायर | १३३/- प्रति बॉक्स | १४०/- प्रति बॉक्स | १३५/- प्रति नग |
| १६ | ट्रेसिंग पेपर फुलसिट/ए/४ | १८२०/- प्रति रोल | २१००/- प्रति रोल | १९५०/- प्रति रोल |
| १७ | टोचे-नमुन्याप्रमाणे लाकडी मुठीचे | ६/- प्रति नग | ८/- प्रति नग | ७/- प्रति नग |

| अ.क्र. | तपशिल | साई प्रिंटर्स एन्ड स्टेशनरी | लकी प्रिंटर्स | निलिमा एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १८ | ब्लेड (पाते) भारत कंपनी | ६/-<br>प्रति पॅकेट | ६.५०/-<br>प्रति पॅकेट | ६.५०/-<br>प्रति पॅकेट |
| १९ | पेपर कटर | १५/-<br>प्रति नग | १९/-<br>प्रति नग | २०/-<br>प्रति नग |
| २० | गोंद बाटली (१५० एम. एल.) कॅमलीन | ४२/-<br>प्रति नग | ४५/-<br>प्रति नग | ४६/-<br>प्रति नग |
| २१ | गोंद बाटली (७०० एम. एल.) कॅमलीन | ९४/-<br>प्रति नग | ११५/-<br>प्रति नग | ९६/-<br>प्रति नग |
| २२ | टाचण्या (शंभर टाचण्याचे पाकिट) लायन ब्रँड | ९/-<br>प्रति पॅकेट | १५/-<br>प्रति पॅकेट | १२/-<br>प्रति पॅकेट |
| २३ | व्हाईट दोरा बंडल नमुन्याप्रमाणे | १६/-<br>प्रति पॅकेट | २५/-<br>प्रति पॅकेट | १९/-<br>प्रति पॅकेट |
| २४ | मेणबत्ती फिश ब्रँड (६ नगाचा बॉक्स) | २९/-<br>प्रति बॉक्स | ३२/-<br>प्रति बॉक्स | २६/-<br>प्रति बॉक्स |
| २५ | मोहोर करण्यासाठी लाख चांगल्या प्रतीचे नमुन्याप्रमाणे (प्रत्येकी ८ काड्यांचा बॉक्स) | ४२/-<br>प्रति बॉक्स | ४८/-<br>प्रति बॉक्स | ४८/-<br>प्रति बॉक्स |
| २६ | ६ इंची टॅग चांगल्या प्रतीचे | ०.१४/-<br>प्रति नग | ०.१८/-<br>प्रति नग | ०.१८/-<br>प्रति नग |
| २७ | पॅडची शाई (५० एम. एल. कोरस) | २७/-<br>प्रति नग | २८/-<br>प्रति नग | २२/-<br>प्रति नग |
| २८ | साधी पेन्सिल (एच. बीऊ. कॅक्लीन) | २८/-<br>प्रति बॉक्स | ३०/-<br>प्रति बॉक्स | २४/-<br>प्रति बॉक्स |
| २९ | ड्रॉईंग पिन्स (१५० नगाचे पाकिटे) | २०/-<br>प्रति पॅकेट | २५/-<br>प्रति पॅकेट | १६/-<br>प्रति पॅकेट |
| ३० | कॉटन फित १ (लाल/पांढरी) नमुन्याप्रमाणे | २२/-<br>प्रति रोल्स | २८/-<br>प्रति रोल्स | १९/-<br>प्रति रोल्स |
| ३१ | आगपेटी (विमङ्को) | ११/-<br>प्रति नग | १/-<br>प्रति नग | ०.९०/-<br>प्रति नग |
| ३२ | चिकटपट्टी १ x ९” | १२/-<br>प्रति नग | १६/-<br>प्रति नग | ८/-<br>प्रति नग |
| ३३ | मांजरपाट - चांगल्या प्रतिचे (मतदाराच्या बोटाला लागलेले तेल किंवा इतर पदार्थ पुसण्यासाठी) ३६ पन्ह्याचे मिटरचे. | १६/-<br>प्रति तुकडा | १८/-<br>प्रति तुकडा | २०/-<br>प्रति तुकडा |
| ३४ | खडू (१४४ नगांचा बॉक्स) | १७/-<br>प्रति बॉक्स | २१/-<br>प्रति बॉक्स | २१.५०/-<br>प्रति बॉक्स |
| ३५ | स्पंज डबी (नमुन्याप्रमाणे) | ८/-<br>प्रति नग | ८/-<br>प्रति नग | ५/-<br>प्रति नग |
| ३६ | स्केच पेन्स (काळा /लाल) नमुन्याप्रमाणे | ३/-<br>प्रति नग | ४/-<br>प्रति नग | ४/-<br>प्रति नग |
| ३७ | सुतळ दोरा बंडळ (नमुन्याप्रमाणे) २०० ग्रॅम बंडल | २८/-<br>प्रति नग | ३५/-<br>प्रति नग | ३५/-<br>प्रति नग |
| ३८ | लवचिक तार - नमुन्याप्रमाणे ६” | १.८०/-<br>प्रति नग | २.९०/-<br>प्रति नग | २.५०/-<br>प्रति नग |

| अ.क्र. | तपशिल | साई प्रिंटर्स एन्ड स्टेशनरी | लकी प्रिंटर्स | निलिमा एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३९ | प्लॅस्टीक कप्स् छोटे नमुन्याप्रमाणे | ४/- प्रति नग | ५/- प्रति नग | ५/- प्रति नग |
| ४० | जाड पुठ्ठयाचे तुकडे - नमुन्याप्रमाणे १/२" २" | १.९०/- प्रति नग | २.८०/- प्रति नग | २.५०/- प्रति नग |
| ४१ | पिवळी लेबल्स नमुन्याप्रमाणे ३" | ०.१६/- प्रति नग | ०.२५/- प्रति नग | ०.२०/- प्रति नग |
| ४२ | सेफटी पिन्स (१० नगाचे पाकिट ) लिब्रा कंपनी | ०.२६/- प्रति नग | ०.३०/- प्रति नग | ०.३०/- प्रति नग |
| ४३ | दाभण मोठी (नमुन्याप्रमाणे) | ३/- प्रति नग | ५/- प्रति नग | ३.५०/- प्रति नग |
| ४४ | सुई छोटी (नमुन्याप्रमाणे) | ३/- प्रति नग | ४/- प्रति नग | ३.५०/- प्रति नग |
| ४५ | दोरा बंडल छोटे नमुन्याप्रमाणे (रिळे) १०नं धागा | १०/- प्रति नग | १२/- प्रति नग | १२/- प्रति नग |
| ४६ | सा. २६ १४ १२ हया साईजच्या मांजरपाटाच्या पिशवी नमुन्याप्रमाणे (पिशव्या नमुन्याप्रमाणेच शिऊन दयावा लागतील.) | ९५/- प्रति नग | १६०/- प्रति नग | १२५/- प्रति नग |
| ४७ | गम ब्रश २ इंची (साईज) | २२/- प्रति नग | ३४/- प्रति नग | २८/- प्रति नग |
| ४८ | वातीचा स्टोव्ह | ५५०/- प्रति नग | ६५०/- प्रति नग | ६००/- प्रति नग |
| ४९ | खळ | ४०/- प्रति किलो | ३८/- प्रति किलो | ३५/- प्रति किलो |
| ५० | हॅन्डलवाली भांडी (ॲल्युमिनिअम) | २९०/- प्रति नग | ३२०/- प्रति नग | २४०/- प्रति नग |
| ५१ | ट्रॅंका मतपत्रिका आणणे व नेणे मतदान केंद्र साहित्याकरिता (३२ १८ १२)२२ गज | ८२०/- प्रति नग | ९५०/- प्रति नग | ९५०/- प्रति नग |
| ५२ | लांब दांडयाचे चमचे | ३०/- प्रति नग | ४०/- प्रति नग | ३८/- प्रति नग |
| ५३ | वायरकटर | ३७/- प्रति नग | ४०/- प्रति नग | ३५/- प्रति नग |
| ५४ | चुनापॅकेट १ किलो | १२/- प्रति किलो | १८/- प्रति नग | १८/- प्रति नग |
| ५५ | लाईन दोरी (१० मीटरचे) | २०/- प्रति नग | २१/- प्रति नग | १८/- प्रति नग |
| ५६ | रबर बॅंड वेगवेगळया साईजचे | १२०/- प्रति नग | १६०/- प्रति किलो | १६०/- प्रति नग |
| ५७ | पेपरवेट | १६/- प्रित नग | १३/- प्रति नग | १२/- प्रति नग |
| ५८ | प्लास्टीक ड्रम १५० लीटर | ६५०/- प्रति नग | ८५०/- प्रति नग | ८००/- प्रति नग |
| ५९ | प्लास्टीक ट्रे (रतन कं.) साईज १५ -१२ | ६२/- प्रति नग | ६५/- प्रति नग | ८०/- प्रति नग |

| अ.क्र. | तपशिल | साई प्रिंटर्स एन्ड स्टेशनरी | लकी प्रिंटर्स | निलिमा एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६०. | प्लास्टीक टब | १३०/-<br>प्रति नग | १४०/-<br>प्रति नग | १५०/-<br>प्रति नग |
| ६१. | गोल सील | १६०/-<br>प्रति नग | १५०/-<br>प्रति नग | १३०/-<br>प्रति नग |
| ६२. | रबर स्टॅम्प | १०५/-<br>प्रति नग | ११०/-<br>प्रति नग | ९५/-<br>प्रति नग |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. साई प्रिंटर्स एन्ड स्टेशनरी अनु. क्र. १, ८, ११ ते २३ व २५, २६, ३३, ३४, ३६ ते ४८, ५०, ५१, ५४, ५६, ५८ ते ६० करिता सादर केलेले निविदेतील दर सर्वात कमी आहेत तसेच अनु. क्र. २ ते ७, ९ ते १०, २४, २७ ते ३२, ३५, ४९, ५२ व ५३, ५५ व ५७, ६१ व ६२ करिता मे. निलिमा एन्टरप्रायजेस यांनी सादर केलेले निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराची तुलना बाजारभावाशी केली असता ते वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास व त्याकामी येणारे देयक अदा करण्यास मा. स्थायि समितीची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**विषय २ : पोटनिवडणूक कामी विविध प्रकारची छपाई करणे.**

महानगरपालिकेने दि. ३०/१०/२००४ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदेतील सूचनेनुसार पोट निवडणूक प्रभाग क्र. १५ (ब) करिता विविध प्रकारची छपाई करण्यासाठी खालील ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | तपशिल | आकृती ग्राफीक्स | गिरिष प्रिटरी | पिनक प्रिंटींग प्रेस |
|---|---|---|---|---|
| १. | विविध प्रकारची फॉर्म छपाई सा. १३" X ८" (विविध रंगीत पेपरवर छपाई एक बाजू) | रु. ४०५/-<br>प्र. शेकडा | रु. ३९०/-<br>प्र. शेकडा | रु. ४०५/-<br>प्र. शेकडा |
| २. | रजिस्टर छपाई सा. ९" X ११" १/२" सफेद पेपरवर छपाई १० पानी रजिस्टर साधे बायडींग | रु. ४००/-<br>प्र. शेकडा | रु. ३७५/-<br>प्र. शेकडा | रु. ३९०/-<br>प्र. शेकडा |
| ३. | पावती बुक छपाई सा. ८" X ६" १/२" सफेद पेपरवर छपाई परफेरिटींग डयुप्लीकेट २५ पानी | रु. ६५/-<br>प्र. शेकडा | रु. ४५/-<br>प्र. शेकडा | रु. ५५/-<br>प्र. शेकडा |
| ४. | निर्देशिका फलक विविध रंगीत कार्ड पेपरवर छपाई | रु. २९००/-<br>प्र. शेकडा | रु. २६५०/-<br>प्र. शेकडा | रु. २८००/-<br>प्र. शेकडा |
| ५. | निर्देशिका फलक छपाई कार्ड पेपरवर | रु. ३६००/-<br>प्र. शेकडा | रु. ३३५०/-<br>प्र. शेकडा | रु. ३५००/-<br>प्र. शेकडा |
| ६. | निर्देशिका बिल्ले विविध रंगीत कार्डपेपरवर छपाई | रु. ९००/-<br>प्र. शेकडा | रु. ७५०/-<br>प्र. शेकडा | रु. ८००/-<br>प्र. शेकडा |
| ७. | कॅप्व्हास पाकीटे/लिफाफे छपाई | | | |
| | अ) सा.११" X ५" | रु. ८६०/-<br>प्र. शेकडा | रु. ७७५/-<br>प्र. शेकडा | रु. ८५०/-<br>प्र. शेकडा |
| | ब) सा.११" X १५" | रु. १०००/-<br>प्र. शेकडा | रु. ९२५/-<br>प्र. शेकडा | रु. ९७५/-<br>प्र. शेकडा |
| | क) सा.१६" X १२" | रु. १५००/-<br>प्र. शेकडा | रु. १२५५/-<br>प्र. शेकडा | रु. १३२५/-<br>प्र. शेकडा |

| अ.क्र. | तपशिल | आकृती ग्राफीक्स | गिरिष प्रिटरी | पिनक प्रिंटींग प्रेस |
|---|---|---|---|---|
| ८. | नियम/मार्गदर्शक पुस्तिका छपाई सफेद पेपरवर छपाई बाईडींगसह | | | |
| | अ) ७० पानी | रु. १००/- प्र. शेकडा | रु. ८५/- प्र. शेकडा | रु. ९०/- प्र. शेकडा |
| | ब) ४० पानी | रु. ९०/- प्र. शेकडा | रु. ७५/- प्र. शेकडा | रु. ८२/- प्र. शेकडा |
| | क) २० पानी | रु. ७५/- प्र. शेकडा | रु. ५५/- प्र. शेकडा | रु. ६५/- प्र. शेकडा |
| | ड) १५ पानी | रु. ६०/- प्र. शेकडा | रु. ४५/- प्र. शेकडा | रु. ५३/- प्र. शेकडा |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. गिरिष प्रिंटरी यांनी सादर केलेल्या निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराची तुलना बाजार भावाशी केली असता ते वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास व त्याकामी देयक अदा करण्यास मा. स्थायी समितीची शिफारस असे.

**विषय ३: महानगरपालिका पोटनिवडणूककामी कर्मचारी वर्गाकरीता खान-पान व्यवस्था करणे.**

महानगरपालिका पोटनिवडणूक १५ (ब) २००४-२००५ कर्मचारी वर्गाकरिता खानपानाची व्यवस्था करणे कामी वृत्तपत्रात दि. ६/११/२००४ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार खालील ठेकेदारांनी दरपत्रके मुदतीत सादर केली आहे.

| अ.क्र. | तपशिल | साई कॅटर्स एन्ड डेकोरेटर्स | अपूर्वा कॅटर्स एन्ड डेकोरेटर्स | सौ. अश्विनी चव्हाण |
|---|---|---|---|---|
| १ | नाश्ता सकाळचा / संध्याकाळचा | १८/- रु प्रति दर | १८.८०/- रु प्रति दर | १९.१०/- रु प्रति दर |
| २ | चहा | ४.२५/- रु. प्रति दर | ४.५०/- रु. प्रति दर | ४.४०/- रु. प्रति दर |
| ३ | कॉफी | ६.२५/- रु. प्रति दर | ६.५०/- रु. प्रति दर | ७.२५/- रु. प्रति दर |
| ४ | दुपारचे जेवण | ७८/- रु. प्रति दर | ८४/- रु. प्रति दर | ८०/- रु. प्रति दर |
| ५ | संध्याकाळचे जेवण | ७८/- रु. प्रति दर | ८४/- रु. प्रति दर | ८०/- रु. प्रति दर |
| ६ | बिसलरी बॉटल | १३.५०/- रु. प्रति दर | १३.८०/- रु. प्रति दर | १४/- रु. प्रति दर |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. साई कॅटर्स एन्ड डेकोरेटर्स यांनी सादर केलेल्या निविदेतील अनु क्र. ४ व ५ मधील दर बाजारभावाशी तुलना केले असता ते अवाजवी आहेत. सदर कामी संबंधित ठेकेदारास दि. १९/११/२००४ रोजी वाटाघाटीकरिता बोलाविले असता दुपारचे जेवण व संध्याकाळचे जेवण रु. ६८/- प्रति दराने देण्यास आपल्या पत्राद्वारे मान्य केले आहे. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास व त्याकामी येणारे देयक मा. स्थायी समितीची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

**विषय ४: महानगरपालिकेस पोट निवडणूक कामी मतपत्रिका छपाई करणे**

महानगरपालिका पोट निवडणूक १५ (ब) २००४-२००५ कामी मतपत्रिका छपाई करण्याकामी दि. ३१/१०/२००४ रोजी दै. मुंबई सकाळ या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन मतपत्रिका छपाई करण्यासंबंधी पूर्वानुभव असलेल्या इच्छूक ठेकेदाराकडून दि.१९/११/२००४ रोजी सीलबंद निविदा मागविण्यात आली आहे. सदर कामी मे. ईमप्रिंट या एकाच ठेकेदाराची निविदा मुदतीत प्राप्त झालेली आहे. सदर निविदा उघडली असता संबंधित ठेकेदार यांनी आपल्या निविदेसोबत पूर्वानुभवाचे कागदपत्र तसेच आयकर प्रमाणपत्र सादर केलेले आहेत. निवडणूकीचे कालमर्यादा लक्षात घेता संबंधित ठेकेदार

यांनी खालीलप्रमाणे मतपत्रिका छ्पाई करणेकामी निविदेतील दर सादर केलेले आहेत. सादर केलेली निविदा स्विकारण्यास शिफारस असे.

| अ.क्र. | तपशिल | दर सर्व करांसह |
|---|---|---|
| १ | पोट निवडणूक प्रभाग क्र.१५ करिता मतपत्रिका छपाई करणे. | रु. ६२३/- प्रति हजारी |

संबधित दि. २०/११/२००४ रोजी मतपत्रिका छपाई कामी कार्यादेश देऊन संबधिताकडून ५२,७०० प्रती मतपत्रिका छपाई करुन घेतलेल्या आहेत.

सदर कामी रु. ३३,००९/- इतका खर्च झालेला आहे. तरी झालेल्या खर्चास मा. स्थायी समितीची मंजूरी मिळणेस शिफारस मिळणे असे.

**विषय ५: महानगरपालिका संत गाडेगेबाबा मोहिमेअंतर्गत गुणपुस्तिका छपाई करणे.**

महानगरपालिकेने संत गाडगेबाबा नागरि स्वच्छता अभियान २००४-२००५ चौथी फेरी कामी गुणपुस्तिका छ्पाई करण्याकामी दि. ३०/१०/२००४ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सूचनेनुसार खालील ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केलेली आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मे. साई प्रिंटर्स एन्ड स्टेशनरी | मे. निलिमा एन्टरप्रायजेस | लकी प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|
| १. | **जनजागृती कार्यक्रम अहवाल पुस्तिका**<br>कव्हर पेज - १७० GSM आर्ट कार्ड चार कलर प्रिटींग फोटोसह.<br>आतील पेज - १३० GSM आर्ट कार्ड चार कलर प्रिटींग एकूण २० पाने<br>फोटो - २१ फोटो<br>फोटॊ स्कॅनिंग, चार कलर प्रिटींग व कव्हर पेज डिझाईनसह<br>बायडींग - स्पायरल बायडींगसह | **६४५/- प्रति नग** | **७५०/- प्रति नग** | **८२०/- प्रति नग** |
| २. | **<u>मुद्‌देनिहाय माहिती व गुणपत्रिका</u>**<br>कव्हर पेज - १७० क्र्च्ग आर्ट कार्ड चार कलर प्रिटींग फोटोसह.<br>आतील पेज - १३० क्र्च्ग आर्ट कार्ड चार कलर प्रिटींग एकूण २० पाने<br>एकूण ११० पाने फोटो - ११<br>बायडींग - स्पायरल बायडींगसह | **२,९५०/- प्रति नग** | **३,२००/- प्रति नग** | **३,४८५/- प्रति नग** |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. साई प्रिंटर्स एन्ड स्टेशनरी यांनी सादर केलेले निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराची तुलना बाजारभावाशी केली असता ते वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास व त्याकामी येणारे देयक अदा करण्यास मा. स्थायी समिती शिफारस असे.

**विषय ६: महानगरपालिकेस वॉटर कूलर प्युरिफायर पुरवठा करणे.**

महानगरपालिकेस वॉटरकूलर व प्युरिफायर खरेदी करणेकामी कामी दि. ३०/१०/२००४ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालील ठेकेदारांनी आपली दरपत्रके मुदतीत सादर केलेली आहेत.

| अ. क्र. | तपशिल | सिरटेक्नोग्राफ प्रा लि. | हर्षद एन्टरप्रायजेस | लकी प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|
| १. | वॉटर कुलर खरेदी | ५२,६५५/- प्रति नग | ५५,६१९/- प्रति नग | ५४,८५८/- प्रति नग |
| २. | प्युरिफायर खरेदी | ९,८००/- प्रति नग | १०,५००/- प्रति नग | १०,१०२/- प्रति नग |

वरिल तुलनात्मक तक्ता पाहता मे. सिरटेक्नोग्राफ प्रा लि. यांनी सादर केलेले निविदेतील दर सर्वात कमी आहेत. सर्वात कमी दराची तुलना बाजारभावाशी केली असता ते वाजवी आहेत. तरी सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यास व त्याकामी येणारे देयक अदा करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ७ खंड (ड) नुसार वरिल प्रकरणी मा. स्थायी समिती ने अवलोकन केले.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**अशोक पाटील :-**

सभापती महोदय, दोन स्थायी समितीच्या सभेपूर्वी आपण आम्हाला आश्वासन दिले होते, काशिमिरा रोडचा आमचा पाहणी दौरा केला होता. तो विषय आपण या विषयपत्रिकेवर आणणार होता, पुढच्या सभेत आणू असे. आपण ह्याचा तिथे पाहणी दौरा केलेला आहे.

**मा. सभापती :-**

मला सदर विषयाची माहिती पुर्ण मिळालेली नाही. ती माहिती मला पुर्ण मिळाल्यानंतर तो विषय घेण्यात येईल असे मी तुम्हाला बोललो आहे.

**अशोक पाटील :-**

साहेब, आपण त्या डिपार्टमेंटला घेवून बसलात तर एका तासात आपल्याला माहिती मिळेल.

**मा. सभापती :-**

माहिती घेवून, मी विषय घेतोय ना! जसा आरोग्याचा विषय तसा तो ही विषय घेवू.

**अशोक पाटील :-**

साहेब आपण ह्याची अंमलबजावणी अगदी काटेकोरपणाने बजवावी. हा जो ठराव केला आहे त्याची अंमलबजावणी कायदेशीर करून पुन्हा तो विषय आमच्या सभागृहासमोर आणण्यात यावा आणि त्याचप्रमाणे लेखापरिक्षण अहवालाचा जो विषय तहकूब आहे तो अजून का घेतला नाही.

**मा. सभापती :-**

त्याच्याबाबत मी मागेदेखील आपल्याला निर्देशन दिले आहे की, सदस्यांचे आक्षेप त्याच्यावर आलेले आहे आणि त्या आक्षेपावर संबंधित अधिकाऱ्यांवर चर्चा करायची आहे आणि ती चर्चा केल्यानंतर तो विषय आणू.

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपण सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.४५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**